Special Issue, January- 2019

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Refereed Research Journal

VIDYAWARTA®

# NAGNATH ARTS, COMMERCE & SCIENCE

College Aundha (N.) Dist.Hingoli (M.S.)

Sponsored

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE ON

# New Education Policy & Higher Education

Monday 28th January, 2019

◇ Organized by ◇

Department of Commerce

**NAGNATH ARTS, COMMERCE & SCIENCE**

College Aundha (N), Dist.Hingoli (M)

◇ Organising Secretry ◇

Dr.V.S.Kanwate

Principal

◇ Convener ◇

**Dr.Ganesh N.Bokare**

Head Department of Commerce

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेली समता, स्वातंत्र, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये जगातील कोणत्याही व्यक्तिच्या विकासची मूल्ये आहेत.

**सारांश :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जागतिककिर्तीचे विचारवंत व समाजसुधारक होते. त्यांच्या सामाजिक सुधारणा हया इतर समाजसुधारकांना सुधारणापेक्षा वेगळया स्वरुपाच्या असल्याचे आपल्या लक्षात येते. इतर समाजसुधारकांच्या सुधारणा हया एका विशिष्ट मर्यादेपर्यंत म्हणजे त्या मोजक्याच क्षेत्रापुरत्या होत्या. उदा. कौटुंबिक, राजकीय व अर्थिक इ.मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते या सोबतच सामाजिक सुधारणा महत्वाच्या आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतात केवळ वरवरच्या सुधारणांद्वारे सामाजिक परिवर्तन होणे शक्य नांही. याची पुर्ण कल्पना होती. त्यांच्या मते सामाजिक सुधारणा म्हणजे समाजसंरचेत सुधारणा करणे. यासाठी त्यांनी देशातील बहुजन, शोषित, वंचित, कामगार, स्त्री यांच्यात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांना महत्व देऊन न भुतो न भविष्यती सामाजिक सुधारणा घडवुन आणल्या . म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समाज सुधारणेचे महत्व जागतिक पातळीवर आहे. त्यांच्या विचारांची समाज सुधारणेच्या कार्याची जागतिकरणाच्या प्रक्रियेतमध्ये आजही तेवढीच प्रासंगिता, समपर्कता दिसून येते.

**संदर्भ सूची :-**


१. समाजशास्त्रज्ञ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर : डॉ.प्रदिप आगलावे/सुगावा प्रकाशन, पुणे

२. धम्मचक्र प्रवर्तनाय (डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची बौध्द धम्मावरील भाषणे व लेख) : संपादक :- प्रदिप गायकवाड / समता प्रकाशन, नागपूर

३. समाजशास्त्रीय विचार : डॉ.बी.एम.कऱ्हाडे / पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लि., नागपूर

४. जागतिकीकरणाची आरिष्टे : संपादक : उत्तम कांबळे / प्रकाशक - सचिव कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सवी समिती, रेड फलॅग बिल्डिंग बिंदू चौक, कोल्हापूर

५. भारतीय समाजातील प्रमुख धर्म : प्रा.डॉ.ज्योती डोईफोडे / कल्पना प्रकाशन, नांदेड

६. सामाजिक संस्था आणि सामाजिक गट : प्रा.कुलकर्णी / प्रा.गंदेवार, विद्याभारती प्रकाशन, लातूर

७. मानवी हक्क आणि समाज : डॉ.राजशेखर सोलापूरे,अरुणा प्रकाशन लातूर


❑❑❑

**05**

# स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री शिक्षण आणि सरकारच्या उपाययोजना


**प्रा. सौ. व्ही.भूतडा**
अधिव्याख्याता वाणिज्य विभाग
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गगाखेड जि. परभणी.


**********

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाला. एक लोकशाही राष्ट्र म्हणून जगाच्या इतिहासात भारताचा जन्म झाला. २६ जानेवारी १९५० रोजी खऱ्या अर्थाने भारतात घटनात्मक लोकशाहीला प्रारंभ झाला आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नवयूग सुरू झाले. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारतीय नेत्यांनी जे मार्गदर्शन केले, जी आश्वासने दिली ती प्रत्यक्षात आणण्याची संधी १९४७ नंतर सत्ताधारी बनलेल्या नेत्यांना मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळात संपूर्ण समाज परीवर्तनाचे माध्यम म्हणून स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्याबाबत सर्वांचेच एकमत झाले. स्त्री शिक्षणाबाबत सरकारी स्तरावरून विशेष उपाययोजना करण्यात आल्या. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात मुलींच्या शिक्षणाची प्रगती झपाट्याने झाली. स्वातंत्र्यपुर्व काळाशी तुलना करता ही प्रगती विशेष डोळ्यात भरते. इ. स. १८९२ साली विविध शिक्षणसंस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या सुमारे ३,५०,००० होती. १९०२ मध्ये ती. ४,४७,४७०झाली. १९४७ मध्ये ही संख्या ४१,००,००० होती तर १९६०-६१ मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या १,३८,५८,००० इतकी झाली. वरील आकडेवारीवरून स्त्री शिक्षणाची स्वातंत्र्योत्तर प्रगती होण्यास मदत होते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ नुसार "या कलमाने सक्ती या मोफत शिक्षणाचे बंधन राज्यकर्त्यावर टाकल्याने स्त्री शिक्षणात झपाट्याने वाढ झाली. १९५१ ते २०११ या काळातील जनगणनेच्या आढाव्यावरून आपणास स्त्री शिक्षणाचे प्रमाण समजण्यास मदत होते.

cont...

| वर्ष | साक्षरता | पुरूष साक्षरता | स्त्री साक्षरता | पुरूष व स्त्री साक्षरता फरक |
|---|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.३६ | १८.५० |
| १९६१ | २८.३० | ४०.४० | १५.३५ | २५.०५ |
| १९७१ | ३४.४५ | ४५.९६ | २१.९७ | २३.९८ |
| १९८१ | ४३.५७ | ५६.३८ | २९.७६ | २६.६५ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.२९ | २४.८४ |
| २००१ | ६५.३८ | ७५.८५ | ५४.१६ | २१.७० |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.४६ | १६.६८ |

२०११ मध्ये झालेल्या जनगणनेमध्ये भारतात ३४ कोटी स्त्रिया निरक्षर असण्याची अतिशय धक्कादायक माहिती पुढे आली. जगातील सर्वाधिक निरक्षर स्त्रिया भारतात आहेत हे ही आता सिध्द झाले आहे. साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो की स्वातंत्र्याच्या ६८ बर्षानंतरही इतक्या स्त्रिया निरक्षर राहिल्या हे सरकारी प्रयत्नांच्या अपुरेपणाचे उदाहरण आहे का ? पेला अर्धा सरलेला आहे असे म्हणण्यापेक्षा पेला अर्धा भरलेला आहे असा सकारात्मक विचार केल्यास स्त्री शिक्षणाचे प्रमाण स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा वेगाने वाढले हे मान्य करावे लागते मात्र हा वेग पुरूषांच्या शिक्षणापेक्षा कमी आहे हे ही मान्य करावेच लागते.

**१. राधाकृष्णन आयोग १९४८-४९**

भारतीय शिक्षणाविषयी सर्वांगीण विचार करण्यासाठी भारत सरकारने ४ नोव्हेंबर १९४८ रोजी विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना केली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन या आयोगाचे अध्यक्ष होते. या आयोगाने स्त्री शिक्षणाविषयी पुढील महत्वपुर्ण शिफारसी केल्या.

१. स्त्री शिक्षणासाठी अधिक सवलती उपलब्ध व्हाव्यात.
२. आदर्श स्त्री म्हणून नाव मिळविण्यास देखील स्त्रियांना त्या-त्या क्षेत्रातील तंत्रज्ञानाकडून माहिती मिळविण्याची व्यवस्था केली जावी.
३. स्त्रियांना समान दर्जाचे शिक्षण मिळावे परंतु ते एकसारखे असु नये. स्त्रियांना समाजातील आपला दर्जा कायम आहे याचे ज्ञान असावे त्या करिता त्याकरिता शिक्षण संस्थांनी जबाबदारी पत्कारावी.
४. गृहअर्थशास्त्र व गृहव्यवस्था या संबंधीची आवड मुलींमध्ये निर्माण करावी.
५. सहशिक्षण देणाऱ्या संस्थांनी मुलींना त्यांच्या गरजेनुसार योग्य त्या सुखसोयी उपलब्ध करून देण्याकडे अधिक लक्ष द्यावे.

**२. मुदलियार आयोग १९५२-५३**

माध्यमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी डॉ. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात अला होता. या आयोगाच्या शिफारशींमध्ये मुलींच्या अभ्यासक्रमासंबंधी फार महत्वपूर्ण शिफारस करण्यात आली ती म्हणजे मुलीसाठी गृहविज्ञान या विषयाची सोय सर्व शाळामध्ये करण्यात यावी व बाकी अभ्यासक्रम मुलामुलीसाठी समान असावा. या शिफारसीमुळे मुलगा आणि मुलगी यांच्यातील बौध्दिक समानतेला जणू काही शासकीय मान्यता मिळाली.

**३. दुर्गाबाई देशमुख आयोग १९५८ - ५९**

स्त्री शिक्षणाबाबत अत्यंत महत्वपूर्ण आयोग म्हणजे दुर्गाबाई देशमुख आयोग होय. स्त्री शिक्षणविषयक प्रश्नांचा सखोल अभ्यास करुन शिफारसी करण्यासाठी केंद्र सरकारने ५ मे १९५८ रोजी दुर्गाबाई देशमुख आयोगाची स्थापना केली. १९५९ रोजी आयोगाने आपला अहवाल सादर केला. या आयोगाचे उद्देश खालीलप्रमाणे होते.

अ. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील स्त्री-शिक्षणातील कमतरता भरुन काढण्यासाठी खास उपाययोजना सुचविणे.

ब. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनीच्या शैक्षणिक गळतीचा अभ्यास करणे.

क. प्रौढ-स्त्री-निरक्षरता, अपुरे शिक्षण व निरंतर शिक्षणाच्या सोयी या प्रश्नांचा अभ्यास करणे, त्यांना अर्थार्जनाची क्षमता प्राप्त करुन देण्यासाठी व राजकीय पुनर्रनेत सहभाग घेण्याची क्षमता प्राप्त करुन घेण्यासाठी प्रौढ स्त्री शिक्षणचा अभ्यास करणे.

ड. स्वच्छ कल्याण संघटनांनी स्त्री शिक्षणास पुरविलेली साधने व इतर सुविधांची व्याप्ती व स्वरुप यांचे सर्वेक्षण करणे व अशा संस्थांनी स्त्री-शिक्षणास अधिक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना सक्षम करणे.

इ. औपचारिक शिक्षण किंवा स्त्री-शिक्षणासाठी विशेष व्यावसायिक प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम आखून स्त्रियांनी व्यायसायिक उद्योगात अधिक प्रमाणात पदार्पन करण्यासाठी संधी देण्याची शक्यता व पध्दती यांचा अभ्यास करणे.

**आयोगाच्या शिफारसी**

आयोगाने तीन प्रकारच्या शिफारसी केल्या. त्या म्हणजे त्वरीत अंमलबजावणी करण्याच्या शिफारसी, फक्त स्त्री शिक्षणा संबंधी शिफारसी व सर्वसामान्य शिफारसी होय. अभ्यासक्रम, स्त्री-शिक्षिकांची नोकरी व प्रशिक्षण, व्यायसायिक शिक्षण, प्रौढ-स्त्री शिक्षण, स्त्रियांचे विद्यापीठ स्तरावरील शिक्षण, मागासवर्गीय मुलींचे शिक्षण, अपंग मुलींचे शिक्षण, स्त्री-शिक्षणाचे संघटन, प्रशासन व वित्त पुरवठा अशा स्त्री शिक्षणाच्या विविध क्षेत्रासंबंधी या आयोगाने महत्वपुर्ण शिफारसी केल्या.

१. स्त्री-शिक्षणाची समस्या अत्यंत महत्वाची असून पुढील अनेक वर्षापर्यंत या समस्येला अग्रक्रम द्यावा.

२. या समस्यांसाठी स्वतंत्र प्रशासन यंत्रणा उभारावी.

३. National council for the Education of Girls & Women ची त्वरीत स्थापना करावी.

४. केंद्रीय शिक्षण सल्लागाराची ताबडतोब नेमणूक करावी. तो National council for the Education of Girls & Women चा पदसिध्द सचिव असावा.

५. सरकारी व गैरसरकारी संयुक्त प्रयत्नांतून मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवावा. त्यासाठी सर्व स्तरावरील संस्थांची मदत घ्यावी.

६. स्त्री-शिक्षणासाठी पुढील पंचवार्षिक योजनेत अधिक वित्तपुरवठयाची सोय करावी.

७. सरकारने स्त्री-शिक्षणातील गळतीच्या प्रश्नांसंबंधी उच्च अधिकार समिती नेमावी.

८. ज्याठिकाणी स्त्री-शिक्षिका नाहीत अशा संस्थात शाला मातांची नेमणूक करावी.

९. सहशिक्षण देणाऱ्या संस्थांत मुलींसाठी वेगळी स्वच्छतागृहे असावीत.

१०. दारिद्रयरेषेखालील पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी लेखनसाहित्य, शालेय गणवेश व इतर शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत करावी.

११. प्राथमिक शाळांत वाढत्या संख्येने मुलींना प्रवेश घ्यावा म्हणून खेडेगावातील स्त्रिया आणि महिला मंडळे यांचा शाळा समितीमध्ये सहभाग असावा.

१२. माध्यमिक स्तरावर, विशेषत: ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणासाठी वेगळया शाळा स्थापन कराव्यात.

१३. ज्याठिकाणी सहशिक्षण मान्य नाही अशा ठिकाणी मुले व मुलीसाठी शाळेची वेळ वेगवेगळी टेवावी.

१४. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात मुलींसाठी व्यवसायपुर्व अभ्यासक्रम असावेत. 'उदा.फायलिंग, नोट टेकिंग, सभाचे वृत्तांत लेखन करणे, वृत्तपत्र अहवाल लेखन करणे, हिशोब ठेवणे, पत्रव्यवहार करणे इ.

१५. राज्य सरकारांनी स्त्री-शिक्षिकांच्या प्रशिक्षणासंबंधी कसून प्रयत्न करावे. वाढत्या प्रमाणात त्यांच्या नेमणूका कराव्या.

१६. सर्व शिक्षणसंस्थांमध्ये स्त्री-प्रशिक्षणार्थींसाठी पुरेशा प्रमाणात शिष्यवृत्त्या ठेवाव्या.

१७. व्यावसायिक व धंदेशिक्षणासाठी आंशिक वेळेचे अभ्यासक्रम सुरू करावे.

१८. पॉलीटेक्निकल मधील शिक्षण सहशिक्षण नसावे.

१९. सर्व माध्यमिक विद्यार्थिनीसाठी व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरू करावे. दुर्गाबाई देशमुख आयोगाने खरोखर स्त्री शिक्षणविषयक मुलभूत स्वरुपाच्या शिफारसी करुन स्त्री शिक्षणाला गती देण्याचे महत्वपुर्ण कार्य केले.

**४. राष्ट्रीय महिला शिक्षण परिषद १९५९-६०**

१९५९-६० मध्ये स्थापन झालेल्या या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट देशात स्त्री शिक्षणाविषयी जनमत तया करणे होते.

**५. भक्त वत्सलम समिती १९६३ -६४**

स्त्रीयांच्या शिक्षणाबाबत जनसहयोगाची कमतरता का आहे याच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली.

**६. कोठारी आयोग १९६४**

डॉ.कोठारी अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ जे.पी.नाईक हे या कमिशनचे सचिव होते. कोठारी कमिशन हे एकूणच सर्व शिक्षणव्यवस्थेसाठी नेमलेले होते. कोठारी आयोगाने मुलींच्या शिक्षणासंबंधी पुढील शिफारसी मांडल्या.

१. मुलींच्या शिक्षणाबाबत जनमत जागृती करावे.

२. स्त्री-शिक्षकांची संख्या वाढवावी.

३. शाळेसाठी आवश्यक असणारे अध्ययन साहित्य व जरुर तर कपडेही मुलींना मोफत द्यावेत.

४. ११ ते १३ या वयोगटातील ज्या मुलींना शाळेत येणे शक्य नाही त्यांच्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय करावी.

५. सर्व विविधोद्देशी तांत्रिक शाळांमध्ये मुलींना उपयुक्त असणारे अभ्यासक्रम ठेवण्यात यावेत.

**७. हंसा मेहता समिती**

हंसा मेहता समितीने मुलींच्या साठी असणाऱ्या अभ्यासक्रमाचे परीक्षण करुन काही महत्वाच्या शिफारसी केल्या. प्राथमिक स्तरावर मुलांप्रमाणेच मुलींनाही अभ्यासक्रम शिकविण्यात यावा, माध्यमिक स्तरावर मुलींसाठी गृहशास्त्र या विषयाचा समावेश असावा, मुलींच्या गरजांना अनुसरुन त्यांना हस्तव्यवसायाचे शिक्षण द्यावे, मुलींच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी सर्व शाळांमध्ये शिक्षिकांची संख्या अधिक असावी. मुलींसाठी वसतीगृहाची सोय असावी, त्यांना मासिक उपस्थिती भत्ता व वाहतूकीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशा विविध महत्वपुर्ण शिफारसी त्यांनी केल्या.

**७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६- १९९२**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार "The education of

women should receive emphasis not only on grounds of social justice but also because it accelerates social transformation".

भारतीय शिक्षणपरंपरेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हा महत्वपुर्ण टप्पा मानला जातो. स्त्री शिक्षणविषयक त्यामध्ये पुढीलप्रमाणे विचार मांडण्यात आले.

१. इ.स. १९९० पर्यंत १ ते ५ इयत्तापर्यंतच्या सर्व मुलींची प्राथमिक शिक्षणासाठी नोंदणी करणे आणि इ.स. १९९५ पर्यंत १२ ते १४ वयाच्या मुलींची उच्च प्राथमिक शिक्षणासाठी नोंदणी करणे.
२. १५ ते ३५ वयोगटातील मुलींची व स्त्रीयांची प्रौढ शिक्षण योजनेमार्फत शैक्षणिक कार्यक्रमासाठी नोंदणी करणे.
३. स्त्रीयांना व्यावसायिक, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे तसेच उपलब्ध तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उप्रलब्ध करुन देणे.
४. स्त्रियांच्या समान हक्कांसाठी वरचेवर आढावा घेऊन योग्य कार्यक्रमाची जुळणी करणे, त्यासाठी आवश्यक तेथे केंद्रे स्थापन करणे.
५. शैक्षणिक संस्थामध्ये स्त्रियांचा अधिकाधिक सहभाग घेणे.

**स्त्री-शिक्षणासाठी सरकारच्या उपाययोजना**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये देशाच्या सर्वांगिण विकासासाठी स्त्री शिक्षण ही बाब महत्वाची मानली जाऊन स्त्री शिक्षणात प्रगती करण्यासाठी सरकारी पातळीवर विशेष प्रयत्न करण्यात येत आहे.

**१. इयत्ता १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण**

महाराष्ट्रातील इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत अनुदानित विनाअनुदानित संस्थामध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना शिक्षण शुल्क माफ केले आहे. ही मर्यादा पदवीपर्यंत वाढवावी असे सांगितले जात आहे.

**२. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना**

आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलींना शिक्षणाच्या सवलतींचा लाभ घेता यावा या दृष्टीने या मुलींना दत्तक पालक मिळवून देण्यासंबंधी सदर योजना राबविली जाते. समाजातील शिक्षणप्रेमी, दानशूर व्यक्तीकडून स्वयंस्फूर्तपणे मिळणारा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेव म्हणून ठेवला जातो.त्या मुदत ठेवीतून आलेल्या व्याजातून इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थिनीस दरमहा ३० रू. ची मदत दिली जाते.

**३. उपस्थिती भत्ता योजना**

दुर्बल घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या शिक्षणात सातत्य राहावे यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील इयत्ता पहिली ते चौथी मधील सर्व दारिद्रय रेषेखालील विद्यार्थिनींना आणि या क्षेत्राबाहेरील सर्व मागासवर्गीय विद्यार्थिनींना महिन्यात किमान ७५ टक्के उपस्थिती असल्यास प्रत्येक दिवसासाठी एक रूपया याप्रमाणे भत्ता दिला जातो.

**४. अहिल्याबाई होळकर बस-पास योजना**

ग्रामीण भागातील मुलींसाठी शैक्षणिक वरदान ठरलेली ही योजना आहे.इ.५ ते १० वी पर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्यासाठी एस.टी.ने मोफत प्रवासाची ही योजना आहे.ज्या गावात माध्यमिक शाळेची सोय नाही त्या गावातील मुलींना माध्यमिक शिक्षणसाठी शाळेत ७५ टक्के उपस्थिती असल्यास या योजनेचा लाभ घेता येतो.

**५. मातृप्रबोधन प्रकल्प**

पाल्यांच्या शिक्षणासाठी मातांचे प्रबोधन करणाऱ्या या प्रकल्पामध्ये १९९० अखेर १३ जिल्हयातील ३४० शाळांच्या समावेश होता.ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये नेतृत्व निर्माण करणे, स्त्रीचा सर्वांगिण विकास करणे मुलांचे आरोग्य, शिक्षणाची जबाबदारी याविषयी मातांमध्ये जागृती निर्माण करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मुलीला शिक्षण देण्यासाठी मातांची मानसिक तयारी होण्यास मदत झाली. परिणामी स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले.

६. इतर उपाय

१. मुलींसाठी वसतीगृह स्थापन करणे (शासकीय, प्रियदर्शिनी इ.)
२. स्त्री-शिक्षिकांची नेमणूक करणे.
३. मोफत शिक्षणांची सोय करणे.
४. स्त्री-शिक्षणाबाबत समाजजागृती करणे.
५. स्त्रीयांसाठी अनौपचारिक शिक्षणाची सोय करणे.
६. मागासवर्गिय विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देणे.

निष्कर्ष

१५० वर्षापूर्वी भारतीय समाजव्यवस्थेत पुरूषांच्या तुलनेत महिलांचे स्थान गौण व गुलामगीरीच्या बेडयात बंदिस्त होते. चूल आणि मूल व उपभोग्य वस्तुपर्यंतच ती मर्यादित होती. भारतीय संस्कृतीत अनादिकालापासून चालत आलेल्या जून्या रूढी, परंपरा, चालीरिती यामध्ये स्त्रियांचे आचार विचार वेशीवर टांगल्या गेले होते. स्त्री पुरूष समान असून त्यांचे समता, स्वातंत्र्य आचार विचार अबाधित राहावे यासाठी फुले दांपत्य, डॉ. बाबासाहेब आंबडकर, महर्षि, धोंडोपंत केशव कर्वे शाहू महाराज महात्मा गांधी या समाजसुधारकांनी आपले संपूर्ण आयुष्य घालविले. त्यांच्यामते